# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**उस्मानाबाद जिल्ह्याचा एकात्मिक विकास आराखडा तयार करण्याबाबत.**

**(१) ४१०५६ (०१-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी भौगोलिक परिस्थितीत नैसर्गिक साधने तसेच लाभलेला ऐतिहासिक वारसा लक्षात घेवून अर्थकारणाला चालना देण्यासाठी जिल्ह्याचा एकात्मिक विकास आराखडा बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ञ सल्लागार नेमण्यासाठी लोकप्रतीनिधिनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबादी शेळीला बाजारात मोठी मागणी आहे. उस्मानाबादी शेळी सुधार प्रकल्पाच्या माध्यमातून युवकांना व्यवसाय/रोजगार उपलब्ध होऊन जिल्ह्याचा आर्थिक उत्पन्नात चांगली वाढ झाली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-०५-२०२४) :** (१) सदरचे निवेदन अभिलेखानुसार नियोजन विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथे पंतप्रधान आवास योजनेचे अनुदान देण्याबाबत**

**(२) ४६९८६ (२९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४७ मधील प्रश्न क्रमांक ४३४७९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील पंतप्रधान आवास योजने मधील सुमारे ५५० घरकुलांचा प्रश्न कायम असून नवीन लाभार्थ्यांचे प्रस्ताव सादर होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू लाभार्थांना पंतप्रधान आवास योजनेचे अनुदान वेळेवर देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२४) :** (१) व (२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र. ४ अंतर्गत मलकापूर नगरपरिषदेचे एकूण ६५८ घरकुलांच्या ३ प्रकल्पास केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समितीची मंजुरी दिली आहे.

सदर तीन्ही प्रस्तावांतर्गत रद्द करण्यात येणारी घरकुले वगळता उर्वरीत सर्व घरकुलांसाठी राज्यहिश्याचा १००% निधी व केंद्र हिश्याच्या पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत केंद्र हिश्याचा निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होताच वितरीत करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील पोलिस दलात शिपाई पदाच्या भरतीत झालेला गैरव्यवहार**

**४८१०६ (३१-१०-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील पोलीस दलात ७२० शिपाई पदाच्या भरतीत गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषीं विरोधात चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१), (२) व (३) पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत पोलीस शिपाई भरती-२०१९ मधील लेखी परीक्षेमधील गैरव्यवहार प्रकरणी हिंजवडी पोलीस स्टेशन येथे एकूण ९ आरोपींविरुद्ध २ गुन्हे, निगडी पोलीस स्टेशन येथे एकूण १३० आरोपींविरुद्ध २ गुन्हे, चिंचवड पोलीस स्टेशन येथे ८ आरोपींविरुद्ध १ गुन्हा व पिंपरी पोलीस स्टेशन येथे २ आरोपींविरुद्ध १ गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हे सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ/ तपासावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ येथील चिंतामणी ट्रॅव्हल्स लक्झरी बसचा झालेला भीषण अपघात**

**(४) ४९४५१ (१७-०१-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या नाशिक शहरातील तपोवन येथे भीषण अपघात होऊन १२ प्रवाशांचा होरपळून मृत्यु झाला असल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, ट्रकने धडक दिल्यामुळे सदर बस समोरील बाजू पेटली तसेच बसमध्ये एकुण ५० प्रवासी प्रवास करीत होते त्यापैकी ४३ प्रवासी जखमी झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२१ मध्ये एकूण अपघातात ४,६२२ जणांचा मृत्यु झाला तर १४,४९२ जण जखमी झाले होते, गेल्या वर्षभरात २४१ वाहनांनी रस्त्यामध्ये पेट घेतला त्यामध्ये १९४ जणांचा मृत्यु झाला असून ७९ जण जखमी झाले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीअंती वाहनांचे अपघात रोखण्याकरीता तसेच प्रवाशांना लवकरात लवकर वैद्यकिय सुविधा पुरविण्याबाबत, खाजगी बसमधून प्रवास करणा-या प्रवाशांच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?,

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सदर बसमध्ये एकूण ५४ प्रवासी प्रवास करत होते त्यापैकी अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला असून ४१ प्रवासी जखमी झाले होते.
(३) हे खरे नाही.
सन २०२१ मध्ये बस अपघाताबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| प्राणांतिक अपघात | गंभीर जखमी अपघात | किरकोळ जखमी अपघात | एकूण अपघात | मृत | जखमी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गंभीर जखमी | किरकोळ जखमी |
| ७३ | १०० | ८० | २५३ | ९४ | ३१४ | ३७८ |

(४) यवतमाळ येथील चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या अपघाताच्या अनुषंगाने आडगाव पोलीस स्टेशन, नाशिक येथे गु.र.नं.२४३/२०२२ भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३६, ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का. कलम १८४, १३४ (अ) (ब)/ १७७ प्रमाणे दि.०८.१०.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
वाहनांचे अपघात रोखण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.
• सदर घटनेच्या अनुषंगाने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलीस यांनी संयुक्तपणे खाजगी बस व ट्रॅव्हल तपासणी मोहिम राबवून विना परवानगी सुरू असलेली वाहतूक व नियमबाह्य खाजगी बसने प्रवासी वाहतूक करणाऱ्या ७६० खाजगी बसेसवर कारवाई करण्यात आली आहे.
• पोलीस अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक, नाशिक महानगरपालिका तसेच खाजगी प्रवासी वाहन मालक, व्यवस्थापक, चालक यांची संयुक्त बैठक घेऊन बस मध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवू नये, वेगमर्यादेचे उल्लंघन करू नये, अवैधरित्या माल वाहून नेऊ नये, वाहनात अग्निशमक यंत्रणा व प्रथमोपचार पेटी ठेवावी, लांबचा पल्ला असल्यास दोन चालक नेमण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
• ओव्हर स्पीड वाहन चालविणाऱ्यां विरुध्द सन २०२२ मध्ये ३५१६३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तृतीयपंथीयांना पोलीस सेवेत आरक्षण देण्याबाबत

**(५) ५३४५७ (१८-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाने तृतीयपंथी समुदायासाठी सन २०१४ मध्ये पोलीस सेवेत आरक्षणाचे आदेश दिले असून तृतीयपंथीयांना **पोलीस सेवेत आरक्षण** नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तृतीयपंथीयांना पोलीस सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१), (२) व (३) पोलीस शिपाई भरती-२०२१मध्ये ऑनलाईन आवेदन अर्जामध्ये तृतीयपंथीयांसाठीचा पर्याय उपलब्ध नसल्याने सदर पदासाठी अर्ज करता येत नसल्याने त्यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई दाखल मुळ अर्ज प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिलेल्या अंतरिम आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल रिट पिटीशन क्र. १५०३३/२०२२ व रिट पिटीशन क्र.१५०३७/२०२२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पोलीस शिपाई व पोलीस शिपाई चालक या पदांसाठी ट्रान्सजेंडर व्यक्तींकरीता शारीरिक पात्रतेचे निकष व शारीरिक चाचणीचे निकष विहित करण्याच्या अनुषंगाने संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्यात आल्या असून त्यानुसार पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय दि.०३.०३.२०२३ अन्वये सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रियेमधील अर्ज/आवेदन पत्रामध्ये लिंग पर्याय म्हणून ''पुरुष''व ''स्त्री''घटकाबरोबरच ''तृतीयपंथी''हा पर्याय उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण ) अधिनियम-२०१९ पारित केला व तृतीयपंथी व्यक्तींकरिता कल्याणकारी योजना राबविण्याबाबत तरतुद केली असून सदर अधिनियमामध्ये आरक्षणाबाबत कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही. सद्य:स्थितीत तृतीयपंथी उमेदवारांसाठी त्यांच्या प्रवर्गनिहाय आरक्षणाचे लाभ उपलब्ध असुन आर्थिकदृष्ट्या मागास खुल्या प्रवर्गातील उमदेवारांसाठी आर्थिक मागास प्रवर्गाचे आरक्षणाचे लाभ उपलब्ध आहेत. तृतीयपंथी व्यक्तींना आवश्यक ते शिक्षण प्राप्त करुन त्यांच्या क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने व त्यांना स्पर्धात्मक युगात सक्षम बनविण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या आरक्षणाचे लाभ मिळत असल्याने कल्याणकारी योजनांच्या मार्फत त्यांची प्रगती साधण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा व्याज परतावा थकीत असल्याबाबत.

**(६) ५८२९७ (३०-०४-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो युवकांना व्यवसायासाठी कर्जे उपलब्ध करुन देण्यात आली असून कर्ज भरल्यानंतर लाभार्थ्यांना व्याज परतावा त्या-त्या महिन्याला देणे आवश्यक असताना चार महिन्याचा कर्ज परतावा प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी,२०२३ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच आमिष दाखवून व्याज परतावा नाकारण्याचे किंवा **थकीत** ठेवण्यायचे प्रमाण वाढल्याने कर्जदारांना मानसिक त्रास सहन करवा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावांना तातडीने मान्यता देऊन लाभार्थ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०९-०५-२०२४) :** (१), (२) व (३) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची योजना लाभार्थीभिमुख असून लाभार्थ्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांची पूर्वतपासणी करून पुढील देण्यात कार्यवाही महामंडळाकडून करण्यात येते. जानेवारी, २०२३ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडे व्याज परताव्याचे १९४६ अर्ज प्रलंबित होते. सद्यःस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील व्याज परताव्याची रक्कम करण्याचे कोणतेही प्रकरण महामंडळाकडे प्रलंबित नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**सातारा येथे शहरानजीक नवीन कारागृह बांधण्याबाबत,**

**(७) ५८५४७ (०८-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा कारागृहात कैद्यांना जागा अपुरी पडत असल्याने सातारा शहरानजीक नवीन कारागृह बांधण्याचा प्रस्ताव जिल्हधिका-यांमार्फत कारागृह प्रशासनाने सादर करण्याचे आदेश पालकमंत्री, सातारा यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, सातारा जिल्हा कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने नवीन कारागृह बांधण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२४) :** (१) होय.
(२) व (३) सातारा शहरानजीक नवीन मध्यवर्ती कारागृह बांधण्याच्यादृष्टीने मौजे क्षेत्र माहुली, ता.जि.सातारा येथील गट नं.५४/२,५७,५८,६१ व ६२ मधील जमीन मागणी करण्यात आलेली आहे. सदर जागेची मोजणी करून सिमांकन करण्यात आलेले आहे. सातारा शहरानजीक उपलब्ध असणारी जागा हस्तांतरणाची कार्यवाही प्रगतीपथावर असून जागेच्या नकाशातील त्रुटींच्या पूर्ततेची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिवती व कोरपणा( जि.चंद्रपूर) तालुक्यातील एव्हरेस्ट वीर नोकरीच्या प्रतीक्षेत**

**(८) ६०९२६ (३०-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती व कोरपणा (जि.चंद्रपूर) येथील पाच विदयार्थ्यांनी मिशन शौर्य २०१८ अंतर्गत जगातील सर्वाधिक उंचीचे एव्हरेस्ट शिखर सर केल्यामुळे त्यांना गृहविभागांत नोकरी देण्याचे आश्वासन दिल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार या एव्हरेस्ट वीर विद्यार्थ्यांना शासकीय सेवेची संधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) व (२) आदिवासी विकास विभागाच्या दि.३०.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये एव्हरेस्ट मोहिमेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.२५ लाख रोख रक्कम पुरस्कारासह सन्मानचिन्ह प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे तसेच सदर विद्यार्थ्यांचे पुढील मोफत शिक्षण व त्यांचे भविष्य विकसित करण्यासाठीची जबाबदारी आदिवासी विकास विभागाने स्वीकारली आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला शासनाच्या सर्व विभागाच्या अस्तित्वातील योजनांचा प्राधान्याने लाभ देण्यास आदिवासी विकास विभागाने मान्यता दिली आहे.

पोलीस दलांतर्गत भरती प्रक्रिया करताना त्या-त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमांतील अटी व शर्तींनुसारच भरती प्रक्रिया राबविणे बंधनकारक आहे. तसेच गिर्यारोहण स्पर्धात्मक क्रीडा प्रकारात समाविष्ट होत नसल्याने खेळाडूंकरीता नोकरीसाठी असलेले आरक्षण गिर्यारोहकांसाठी लागू होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर लकडगंज पोलीस स्टेशन मध्ये महिला कार्यकर्ता यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याबाबत**

**(९) ६१६०० (३०-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर लकडगंज पोलीस स्टेशन मध्ये दिनांक २५ मे २०२० मध्ये महिला कार्यकर्ता व वकिल असलेल्या अंकिता कमलेश शाह यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊन त्यांचेशी असौजन्यपुर्वक वर्तणूक केली असल्याचे निदर्शनास आले असून या महिलेने सदर प्रकरणात याची चौकशी करून संबंधित पोलिसांवर कारवाई करावी, अशी सातत्याने मागणी करुनही याकडे मागील दोन वर्षापासून दुर्लक्ष केले जात आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, या घटनेच्या दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या अनाठायी हल्ल्याचा प्रकार स्पष्टपणे दिसत असतानाही याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करून उलटपक्षी तक्रारदारांना अनेक प्रकरणांमध्ये अडकविण्याचा प्रयत्न संबंधित पोलीस स्टेशन कडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषी असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१), (२) व (३) ॲड. अंकिता कमलेश शाह व त्यांचे पती हे दिनांक २५/०३/२०२० रोजी लकडगंज पोलीस स्टेशन, नागपूर येथे तक्रार करण्यासाठी गेले असता त्यांचेशी असौजन्यपुर्वक वर्तणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने सदर प्रकरणात पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांनी चौकशी करुन पोलीस आयुक्त, नागपूर यांना सादर केलेल्या कसुरी अहवालानुसार श्री.नरेंद्र हिवरे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना समज व भावेश कावरे, पोलीस उपनिरिक्षक यांना रु.१०००/- तसेच श्रीम. माधुरी खोब्रागडे, पोलीस शिपाई व श्रीम. चेतना बिसेन, पोलीस शिपाई यांना प्रत्येकी रु. ५००/- आर्थिक दंडाची शिक्षा देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृहातील कैदयांच्या मृत्यूबाबत**

**(१०) ६१७७७ (२७-०४-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृहात दोन वर्षात ३० कैद्यांचे विविध आजारांनी मृत्यू झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कैद्यांच्या मृत्यूमूळे येथील कारागृह प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून मृत कैद्यांच्या नातेवाईकांनी प्रशासनावर गंभीर आरोप केल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कारागृहातील कैद्यांचे वाढते मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२४) :**

(१) सन २०२१ मध्ये येरवडा मध्यवर्ती कारागृहातील एकूण १७ बंदी मृत झालेले आहेत. त्यापैकी एका महिला बंदी रुग्णाचा मृत्यू कारागृह रुग्णालयात झालेला आहे. तसेच सन २०२२ मध्ये या कारागृहातील एकूण २४ बंदी रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. त्यापैकी २१ मृत्यू हे नैसर्गिक झालेले असून ०३ मृत्यू हे अनैसर्गिक झालेले आहेत.

(२ ) हे खरे नाही.

(३ ) बंद्यांकरीता कारागृहात रुग्णालय असून दैनंदिन उपचाराकरीता बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभाग कार्यरत आहे. बंदी कारागृहात दाखल झाल्यानंतर त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येते. कारागृह रुग्णालयात बंदी उपचाराकरीता विविध वैद्यकीय उपकरणे उपलब्ध आहेत. आजारी बंद्यांना तातडीच्या उपचाराकरीता ससून सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात येते. बंद्यांकरिता दरमहा विविध वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात येऊन वैद्यकीय तपासणी व औषधोपचार देखील करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पहिल्या मजल्यावरील झोपडीवासियांना**
**मोफत घराचा लाभ मिळण्याबाबत.**

**(११) ६४५८६ (१०-१०-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या चाळींचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार पुनर्विकास करताना पहिल्या किंवा त्यावरील मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशांना मोफत घराचा लाभ देता येत नसल्याने जुन्या चाळींचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार पुनर्विकास करण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या असल्याचे माहे मे, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाळीतील पहिल्या मजल्यावरील भाडेकरूना पंतप्रधान आवास योजनेच्या निकषानुसार घर देता येईल का याची तपासणी शासनाकडून करण्यात येत आहे काय, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, चाळींच्या पहिल्या मजल्यावर राहण्याऱ्या रहिवाश्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत तसेच मुंबईतील प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) चाळीतील पहिल्या मजल्यावरील रहिवाशी प्रधानमंत्री आवास योजनेच्या अटी व शर्तींची पुर्तता करीत असल्यास उक्त योजनेचा लाभ घेऊ शकतील.
(३) सन १९७६ पुर्वीच्या व सध्या अस्त्वित असलेल्या चाळींच्या पहिल्या मजल्यावर राहण्याऱ्या रहिवाश्यांना झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत पुनर्वसन सदनिकेचा लाभ देण्याच्या प्रस्तावास शासनाची तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे. तसेच अंतिम मान्यतेच्या अनुषंगाने शासनास सादर करण्याकरिता सविस्तर प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त झाला आहे.
तथापि, झोपडपट्टीतील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिकांचा लाभ देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यासह राज्यात सायबर गुन्हे रोखण्यासाठी संगणक प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत**

**(१२) ६४८५६ (३१-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यासह राज्यात सायबर गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून पोलीस ठाण्यांमध्ये संगणक शिक्षित असलेल्या पोलिसांची नितांत आवश्यकता असल्याचे दिनांक १५ मे २०२३, रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सायबर गुन्हे रोखण्यासाठी शासन संगणक प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) व (२) धुळे जिल्ह्यासह राज्यामधील सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.
संगणक प्रशिक्षण घेतलेल्या पोलीस अंमलदारांचीच सायबर पोलीस ठाण्यामध्ये नेमणूक करण्यात येते. तसेच सायबर पोलीस स्टेशनमध्ये नेमणूकीस असलेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना ऑनलाईन अथवा सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजीत करुन सायबर गुन्हे तपासाकरीता प्रशिक्षीत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलीस भरती निवड सूची समांतर आरक्षणामध्ये महिलांचा कोटा निश्चित करणेबाबत**

**(१३) ६६६६९ (२७-०९-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या २०२३ च्या पुणे व मुंबई येथील पोलीस भरती निवडसूचीमध्ये पोलीस पाल्यांना देण्यात येणारे तीन टक्के समांतर आरक्षणाचा लाभ फक्त पुरुष उमेदवारांना दिले जात असल्याची बाब माहे मे २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आली आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, शासनाने विविध क्षेत्रात महिलांना प्राधान्य क्रमाने प्रोत्साहन देण्याचे धोरण असताना दुसरीकडे पोलीस पाल्यांना देण्यात येणाऱ्या ३% समांतर आरक्षणाच्या लाभापासून महिला उमेदवाराना वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र पोलीस भरती निवडसूची प्रक्रियेत पोलीस पाल्यांच्या तीन टक्के समांतर आरक्षणामध्ये ५० % जागा महिलांना आरक्षित करण्याबाबत चिंचवडच्या स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना दि.२५.०५.२०२३ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस भरती निवड सूची समांतर आरक्षणामध्ये महिलांचा कोटा निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
पोलीस पाल्य समांतर आरक्षणांतर्गत असणारी पदे शासन निर्णय दि.२२.०८.२०१४ मधील तरतुदीनुसार उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार भरण्यात येत असल्याने त्यामध्ये पुरुष व महिला अशी वर्गवारी करण्यात येत नाही.
(३) व (४) पोलीस पाल्यांसाठी समांतर आरक्षणांतर्गत ३% राखीव कोटा असून अशा समांतर आरक्षणामध्ये पुरुष व महिला अशी विगतवारी करण्याची तरतूद नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वांद्रे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए ) कार्यालयामध्ये सक्षम अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१४) ६६७१२ (०३-०९-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए ) कार्यालयामधील अनेक अधिकारी पदे मागील अनेक महिन्यापासून रिक्त असल्याने नागरिकांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सक्षम अधिकारी - ९ चे तत्कालीन उपजिल्हाधिकारी मोहन नळदकर यांची माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये बदली झाल्यानंतर सदर विभागाचा कारभार हा सक्षम अधिकारी - ८, चे उपजिल्हाधिकारी शिवाजी दावभट यांच्याकडे असल्यामुळे प्रधेकारी - ९ च्या कामांना विलंब होत असल्याच्या तक्रारी झोपडीधारकांकडून करण्यात येत असून प्राधिकारी- ९ मध्ये कुर्ला येथील असल्पागाव किरोळ मोहिली व कुर्ला भाग १,२,३ आणि ४ मधील झोपड्या येत आहे या सर्व झोपड्यांचे सर्व्हे करणे, झोपडीधारकांची पात्रता निश्चित करणे आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करणे अशी विविध कामे असून मात्र या विभागाला स्वतंत्र सक्षम प्राधिकारी नसल्याने या ठिकाणी असलेल्या झोपडीधारकांची नाहक गैरसोय होत आहे, हेही खरे आहे,
(३) असल्यास, वांद्रे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए ) कार्यालयामध्ये संपूर्ण मुंबईतील झोपडपट्टी धारकांची कामे सक्षम अधिकारी यांच्या मार्फत केली जात असतांना ही मागील अनेक महिन्यांपासून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए ) कार्यालयामध्ये अनेक अधिकाऱ्यांची पदे मागील अनेक वर्षांपासून रिक्त असण्याचे सर्वसाधारण कारणे काय आहे,
(४) असल्यास, सक्षम अधिकाऱ्यांची असलेली महत्वाची कामे विचारात घेता झोपडपट्टी धारकांची प्रलंबित कामे लवकरात लवकर निकालात काढण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०६-२०२४) :**१) हे खरे नाही.
(२) श्री. मोहन नळदकर यांना सक्षम प्राधिकारी-९ या पदावरुन दि. २२.८.२०२२ रोजी कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यामुळे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सक्षम प्राधिकारी-८ यांच्याकडे देण्यात आला होता. तद्नंतर सक्षम प्राधिकारी-९ या पदावर दि. १८.५.२०२३ रोजी अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. सद्य:स्थितीत सक्षम प्राधिकारी-८ व ९ ही दोन्ही पदे भरलेली आहेत.

(३) व (४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई अंतर्गत सक्षम प्राधिकारी १ ते १० ही सर्व पदे भरलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई, न्यू प्रभादेवी, वाकडी चाळ या पुनर्विकास प्रकल्पात विकासकाकडून होणा-या अन्यायाबाबत

**(१५) ६७६३६ (१०-१०-२०२३). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, न्यू प्रभादेवी, वाकडी चाळ येथील भूखंड क्र. १०६३, हा प्रकल्प सन २०१० साली पुनर्विकासासाठी घेतला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाला म्हाडा ने सन २०१३ साली ना - हरकत प्रमाणपत्र दिले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकाकडून भाडेकरूंना संक्रमण शिबिराचे भाडे देण्यात आले नसून विविध करापोटी चुकीच्या पद्धतीने लादलेली रक्कम रहिवाशांकडून सक्तीने वसूल करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रकल्पाला स्थगिती देऊन विकासकावर कारवाई करण्यासह चुकीच्या पद्धतीने लादलेली रक्कम रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०३-०६-२०२४) :** (१) व (२) होय,हे खरे आहे.
(३) व (४) विकासकांकडून भाडेकरूंना संक्रमण शिबीरापोटी भाडे देण्यात आलेले नाही. तसेच विविध करापोटी चुकीच्या पध्दतीने रहिवाश्यांकडून रक्कम वसुल करण्यात येते याबाबत भाडेकरु / रहिवाश्यांनी दि.२८.०३.२०२३ रोजी तक्रार मंडळास केलेली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्रधारक व भाडेकरु / रहिवाशी यांची दि.१२.०६.२०२३ रोजी संयुक्त बैठक घेऊन भाडेकरु / रहिवाश्यांना गाळयांच्या थकीत भाड्यापोटी नोटीसा देऊ नये, भाडेकरु / रहिवाश्यांना संक्रमण शिबीरापोटी भाडे देण्यात यावे, असे आदेश विकासकास देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ३३ हजार इमारती २५ वर्षांपासून पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत

**(१६) ६८४१३ (०३-०९-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ३३ हजार इमारतीतील लाखो रहिवासी मागील २५ वर्षांपासून पुर्नविकासाच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, शासनाच्या आदेशान्वये रहिवाश्यांनी मूळ भाड्याच्या १०० पटीनुसार ३० टक्के रक्कमही भरली आहे, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, अद्यापर्यंत पुर्नविकास झाला नसून घरभाडे मात्र सुरूच आहे हे ही खरे आहे का ?
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ईमारतीचा पुर्नविकास करुन प्रतिक्षेत असलेल्या रहिवाश्यांना घरे मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) ज्या प्रकरणांमध्ये म्हाड अधिनियमातील तरतुदीनुसार भूसंपादनाबाबतची कार्यवाही झाली आहे त्या प्रकरणांमध्ये रहिवाश्यांनी मूळ मालकांस भाडे भरण्याची आवश्यकता नसते.

उपकरप्राप्त इमारतीमधील / भाडेकरु / रहिवाशी यांनी ते रहिवास करीत असलेल्या इमारतीचे भूसंपादन करुन ती मालमत्ता दुरुस्ती / पुनर्बांधणीसाठी त्या इमारतीच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे हस्तांतरीत करण्याची विनंती केल्यास म्हाड अधिनियम, १९७६ मधील प्रकरण ८ अ मधील कलम १०३ ब अन्वये अशा मालमत्तेचे भुसंपादन केले जाते. तथापि, Property Owners Association यांनी सदर प्रकरणाविरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल केली असून सदर याचिका ही ९ न्यायाधिशांच्या न्यायपिठाकडे प्रलंबित आहे. सदरहु मालमत्तांचे संबंधित नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हस्तांतर करणे शक्य नसल्याने अशा इमारतींची पुनर्बाधणी/पुनर्विकास होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात शासनाची बाजू मांडण्यासाठी महान्यायवादी व अतिरिक्त महान्यायवादी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि. पुणे) शहराच्या विस्तारित भागात नवीन पोलीस चौकी सुरु करण्याबाबत

**(१७) ६९११६ (३१-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दौंड शहर (जि. पुणे) गोपाळवाडी रोड परिसरात गजानन सोसायटी, भवानीनगर, शिवराज नगर, सरपंचवस्ती, दत्तनगर, भोईटेनगर, देवकीनगर पंचगंगा सोसायटी परिसरात वारंवार चोरीच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर भागात दौंड पोलीस ठाणे अंतर्गत नवीन पोलीस चौकी निर्माण करण्याबाबत नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधीनी विनंती केलेली आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत गृह मंत्री यांनी मुख्याधिकारी नगरपालिका दौंड यांना जागा उपलब्ध करून देणेबाबत पत्रव्यवहार केला आहे, हेही खरे आहे काय काय,

(४) असल्यास, उक्त पोलीस चौकी निरर्माण करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०२४) :** (१) दौंड पोलीस ठाणे हद्दीत दौंड शहरामध्ये मागील ३ वर्षात घडलेल्या दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरी या मालमत्तेच्या गुन्हयांची माहिती पुढीलप्रमाणे :-

| | दाखल गुन्हे | | |
|---|---|---|---|
| | सन २०२१ | सन २०२२ | २०२३ (माहे सप्टे २०२३) |
| दरोडा | ०२ | ०१ | -- |
| जबरी चोरी | -- | -- | -- |
| घरफोडी | ०३ | ०२ | ०४ |
| चोरी | ०६ | ०४ | ०४ |

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुख्याधिकारी, नगरपालिका, दौंड यांना सदर भागामध्ये जागा उपलब्ध होऊन बांधकाम करुन मिळणेबाबत दिनांक २२/१०/२०२१ रोजी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने जागा उपलब्ध होणेबाबत नगरपालिकेकडून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

(४) उक्त प्रस्ताव शासनास अद्याप अप्राप्त आहे. प्रस्ताव प्राप्त होताच नियमानुसार तपासून, पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बावला कंपाउंड , चिंचपोकळी (पश्चिम) मुंबई येथील इमारतीचा समूह विकास [ क्लस्टर ] योजनेअंतर्गत करण्याबाबत**

**(१८) ६९८६९ (१४-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावला कंपाउंड, चिंचपोकळी (पश्चिम) मुंबई येथील इमारतीचा समूह विकास [ क्लस्टर ] योजनेअंतर्गत करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २००९ मध्ये वा त्यादम्यान घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा कडून ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यात आले परंतु म्हाडाने नियम बदलून ना हरकत प्रमाणपत्र रद्द केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरिक यांनी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाकडे यासंदर्भात दाद मागितली व सर्वोच्च न्यायालयाने म्हाडाच्या अटी रद्द करून समूह विकास योजना राबविण्याबाबतचा माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तातडीने समूह विकास क्लस्टर योजना राबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०३-०६-२०२४) :** (१), (२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दि. २७.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये बावला कंपाउंड चिंचपोकळी, मुंबई येथील इमारतींची समुह पुनर्विकास योजना त्यावेळेच्या प्रारूप विकास नियंत्रण नियमावली ३३(९) नुसार राबविण्यासाठी उच्चाधिकार समितीकडे प्रस्ताव सादर करणे व नगरविकास विभागाकडून इरादापत्र प्राप्त करून घेण्यासाठी विकासकास ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते.

प्राधिकरण ठराव क्र.६६३६, दि.३१.१०.२०१३ अन्वये मंडळाने भूसंपादीत केलेल्या सर्व भूखंडांचा पुनर्विकास मंडळाने करावा असा ठराव मंजूर केला. तद्नंतर दि.२७.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये मे.दर्शन प्रॉपर्टीज यांना दिलेले LOI / NOC रद्द करण्यात आले. मंडळाच्या सदर निर्णयाविरुध्द विकासक यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.१६८०/२०१४ मध्ये मंडळाने दि.२७.०६.२०१४ रोजी घेतलेला निर्णय रद्द करुन विकासकाच्या बाजूने निकाल दिला. सदर निकालाविरुध्द मंडळाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.१३९३०-१३९३१/२०१५ दाखल केली. तद्नंतर म्हाडाने केलेल्या विनंतीनुसार दि.२३.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका खारीज केली आहे.

(४) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दि. २८.०२.२०२० व दि. १७.०९.२०२१ रोजी सदर समुह पुनर्विकास योजनेस उच्चाधिकार समितीची मंजुरी घेण्याच्या दृष्टीने भाडेकरू / रहिवाश्यांची प्रमाणित यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठविली आहे. महानगरपालिकेने दि. २२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर समुह पुनर्विकास योजनेस इरादापत्र (Letter of Intent) प्रदान केले असून या समुह पुनर्विकास योजनेच्या नकाशांना दि.२०.०१.२०२३ रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. सद्य:स्थितीत मालमत्तेवरील भाडेकरू / रहिवाश्यांच्या निष्कासनाची कार्यवाही सुरु आहे. विकासक व म्हाडा यांच्यामधील संयुक्त पुनर्विकास करारनामा नोंदणीकृत करण्याबाबत कार्यवाही सुरु असून सदर करारनामा नोंदणीकृत झाल्यानंतर या योजनेच्या प्रत्यक्ष कामास सुरूवात केली जाईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई व उपनगर परिसरातील रेल्वेच्या जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत**

**(१९) ६९९२२ (०४-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ठाणे व इतर परिसरातील रेल्वेच्या जमिनीवर अतिक्रमण करण्यात येऊन त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झोपड्या असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वेच्या जमिनीवरील झोपडी धारकांसाठी व रेल्वेची जमीन खुली करण्यासाठी शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात संदर्भात शासनाने परिपूर्ण असा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने केंद्राकडे पुन्हा पाठपुरावा केला आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(Z)(६) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाच्या संबंधित जमीन मालक प्राधिकरणाची ना-हरकत असल्याशिवाय त्यांच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करता येत नाही. ना-हरकत प्रमाणपत्रासाठी रेल्वेकडे पाठपुरावा करुनही झोपडपट्टी पुनर्वसनासाठी ना-हरकत प्राप्त होत नाही.

या पार्श्वभूमीवर रेल्वेच्या जमिनीवरील पुनर्वसन योजनांसाठी ना-हरकत देण्याबाबत अन्यथा प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रेल्वेच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याबाबत दिनांक २३,मार्च २०२२ व दिनांक.२१,फेब्रुवारी २०२३ रोजीच्या पत्रांन्वये केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास कळविण्यात आले आहे. रेल्वेच्या जागेवरील झोपु योजनेस केंद्र शासनाकडून ना-हरकत प्राप्त झाल्यानंतरच प्रकरणी पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडगावशेरी (जि.पुणे) येथील अनधिकृतपणे सुरु असलेल्या पब बाबत

**(२०) ७०८४९ (०३-०९-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगावशेरी (जि.पुणे) मतदारसंघामधील खराडी, चंदननगर, कल्याणी नगर, विमान नगर आदी भागांमध्ये अनधिकृपणे पब चालविले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पब रात्री उशिरापर्यंत चालू असल्यामुळे परिसरातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैध पब वर प्रशासनाने किती वेळा कारवाई वा करण्यात आली,
(४) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध पब कडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) विमानतळ पोलीस स्टेशनच्या कार्यकक्षेतील विमाननगर भागात माफिया बार ॲण्ड व्हेज-नॉनव्हेज रेस्टॉरंट ही अधिकृत पब आस्थापना आहे. सदर आस्थापना रात्री उशिरापर्यंत चालू असल्यामुळे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३३ (क्ष) आरडब्ल्यू सह १३१ प्रमाणे एकूण ४ खटले नोंद करण्यात आले आहेत.तसेच, सदर परिसरातील इतर ६ हॉटेलवर एकूण ८ खटले दाखल करण्यात आले आहेत.

येरवडा पोलीस स्टेशनच्या कार्यकक्षेतील कल्याणीनगर भागात हॉटेल एलोरा नावाचा अधिकृत पब असून, सदर आस्थापना ध्वनीप्रदूषण करीत असल्याने भा.दं.वि. कलम १८८, २९१, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३७ (१), सह १३१ प्रमाणे २ गुन्हे दाखल करण्यात आले असून, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३३ (क्ष) आरडब्ल्यू सह १३१ प्रमाणे एकूण ९ खटले नोंद करण्यात आले आहेत. तसेच, सदर परिसरातील इतर ५ हॉटेलवर एकूण ८ खटले दाखल करण्यात आले आहेत.

कल्याणीनगर भागात दररोज सिव्हील कपड्यांवर दोन अंमलदार नेमले जातात. सदर प्रकरणी पोलीस प्रशासनाकडून कर्तव्यात कोणतीही कसूर करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुभाष नगर ,चेंबुर येथील सुभाषनगर हाउसिंग फेडरेशन युनियन व नेत्रावती को. ऑप .हा.सो.ली. बिल्डिंग न ६ यांचे कार्यकारी मंडळ स्थापन करण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत**

**(२१) ७१५२० (१४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुभाष नगर ,चेंबुर येथील म्हाडा वसाहतीतील सुभाषनगर हाउसिंग फेडरेशन युनियन व नेत्रावती को. ऑप. हाउसिंग सोसायटी बिल्डिंग नं ६ यांचे नवीन कार्यकारी मंडळ स्थापन करण्यास म्हाडाकडून विकासकांच्या फायद्यासाठी व विकास कामात अडथळा आणण्यासाठी कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. अतुल सावे (०४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२४.१२.२०२२ च्या सुभाष नगर हाउसिंग फेडरेशन युनियन लि. सुभाष नगर, चेंबूर, मुंबई व नेत्रावती को.ऑप.हाउसिंग सोसायटी बिल्डिंग नं ६ सुभाष नगर, चेंबूर, मुंबई या संस्थांची निवडणूक घेऊन नवीन कार्यकारी मंडळ स्थापन करण्याबाबत कळविले होते.

त्यानुषंगाने सुभाष नगर हाउसिंग फेडरेशन युनियन लि. सुभाष नगर, चेंबूर, मुंबई या संस्थेची निवडणूक घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि.२६.११.२०२३ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करुन निवडणूक प्रक्रिया सुरु केली आहे.

नेत्रावती को.ऑप.हाउसिंग सोसायटीतील बिल्डिंग नं ६ सुभाष नगर, चेंबूर याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार सदर संस्थेची दि.२६.११.२०२३ रोजी निवडणूक प्रकिया पूर्ण करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाकडून भाडेपट्टा करारनामा नुतनीकरण करताना भुईभाड्यामध्ये आणि दंडात्मक रक्कमेमध्ये करण्यात आलेली असह्य भरमसाठ रद्द करण्याबाबत.**

**(२२) ७१५६६ (०१-११-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील चारकोप गोराई ही सन १९८५ दरम्यान म्हाडाने निर्माण केलेली मोठी वसाहत असून अत्यल्प, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न असलेल्या कुटुंबांना म्हाडाने अ,ब,क,ड, असे गट करुन सोडती व्दारे त्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी मोकळे भूखंडे दिले व रहिवाश्यांनी सहकारी गृह निर्माण संस्था बनवून जागतीक बँकेच्या अर्थ सहाय्याने मोकळ्या भूखंडावर घरे बांधून घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडेपट्टा करारानुसार बैठ्या घरांसाठी रुपये १/- प्रती सभासद प्रती महिना व उच्च उत्पन्न गटासाठी जमीनीच्या किंमतीच्या १% वार्षिक अशाप्रकारे भुई भाड्याची आकारणी म्हाडाकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भाडेपट्टा करार हा तीस वर्षा पर्यंत होता. ३० वर्षाची मुदत सन २०१६ मध्ये संपली तोपर्यंत म्हाडाचे भाडेपट्टा नूतनीकरण धोरण ठरले नव्हते, तरीसुध्दा मुदत संपल्यानंतर म्हाडाकडून रुपये १ /- बैठ्या घरासाठी व १ % उच्च उत्पन्न गटासाठी असलेले भुईभाडे रुपये ११३५ /- प्रती महिना प्रती सदनिका आकारणी करण्याचे निश्चित केले असल्याचे समजते. अशी आकारणी केल्यास दंडाची रक्कम कोटीच्या घरात जाईल. तसेच म्हाडाने भाडेपट्टा धोरणच सन २०२१ मध्ये ठराव करुन मंजूरी दिली असून दंड मात्र सन २०१६ पासून आकारणी केली जात आहे, येथे राहणारे सर्व रहिवाशी मध्यमवर्गीय असल्यामुळे त्यांना हे परवडणारे नसून हे त्यांच्यावर अन्यायकारक असल्याने, प्रत्येक ५ वर्षानंतर भुईभाड्यात सुधारणा करण्याचा निर्णय रद्द करावा अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे. हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रहिवाशांनी केलेल्या मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-०६-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) व (४) भाडेपट्टा नुतनीकरणाचे नविन धोरण ठरल्यानंतर नविन दरानुसार येणारी फरकाची रक्कम भरण्यास तयार असल्याबाबत ज्या अर्जदारांनी प्रतिज्ञापत्र सादर केले, त्यांना पुढील ३० वर्षासाठी नुतनीकरण जुन्या अटी, शर्ती व दराने करण्यात यावे. मात्र असे नुतनीकरण करुन घेताना नुतनीकरणाच्या करारामध्ये, शासन व प्राधिकरणाचे धोरण जे भाडेपट्याच्या दर नुतनीकरण संदर्भात लागू ठरेल त्याप्रमाणे भाडेपट्टा आकारण्यात येईल व त्याप्रमाणे भाडेपट्टा म्हाडाला अदा करणे लाभधारक संस्थेस/न्यास/महामंडळे यांना बंधनकारक राहील असे स्पष्टीकरण नवीन करारनामा करताना करण्यात यावे, असा निर्णय म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६१२९, दि.२४.०८.२००५ अन्वये, घेण्यात आला.
तद्नंतर म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६९९५ अन्वये, दि.२६.०८.२०२१ नुसार भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणानंतर भू-भाडयाच्या (Lease Rent) रक्कमेमध्ये दर ५ वर्षांनी त्यावेळच्या बाजारमुल्याप्रमाणे २५% इतक्या हिश्याप्रमाणे सुधारणा करावी, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) रावेत येथे नवीन बंधारा बांधण्याबाबत प्रस्ताव

**(२३) ७१५९२ (०१-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) रावेत येथील पवना नदीवरील बंधाऱ्यांमधून पाणीपुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रावेत बंधाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर घाण साचल्याने बंधाऱ्याची साठवण क्षमता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने नवीन रावेत बंधारा बांधण्याचा प्रस्ताव नाशिक येथील महाराष्ट्र इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट मेरी या संस्थेकडे प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी उक्त संस्थेकडे प्रलंबित असलेला प्रस्ताव तातडीने मंजूर करुन पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०२४) :** (१) होय.

(२) होय,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर बंधाऱ्यात गाळ असलेबाबत त्यांच्या दि.२१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयास कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

नवीन बंधारा हा जुन्या बंधाऱ्याच्या अधो बाजूस ३० मी.अंतरावर प्रस्तावित असून नवीन बंधाऱ्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निधीतून अनामत ठेव पध्दतीने जलसंपदा विभागामार्फत करावयाचे प्रस्तावित आहे. रावेत येथील नवीन बंधारा बांधण्यासाठी आवश्यक भुतांत्रिक अहवाल प्राप्त असून त्याअनुषंगाने मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांनी प्रस्तावित बंधाऱ्याच्या संरेखेची क्षेत्रीय पाहणी केली आहे. पाहणीच्या वेळी दिलेल्या सूचनेनुसार "संकल्पन प्रस्ताव" मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना सादर करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नवीन न्यायालयीन इमारतीवर दोन मजले वाढविण्याबाबत**

**(२४) ७१७२५ (१७-०२-२०२४). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नवीन न्यायालय इमारतीवर दोन मजले वाढविण्यासाठी व जुन्या मोडकळीस आलेल्या न्यायालयाच्या इमारती जागी नवीन न्यायालय इमारत उभारण्यासाठी जास्तीत जास्त आर्थिक निधीची तरतूद करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विधी व न्याय मंत्री, यांच्याकडे माहे सप्टेंबर २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन न्यायालयामध्ये तळमजल्या अधिक एक मजल्यावर एकूण ८ कोर्ट हॉल असून सद्यस्थितीत दाटीवाटीने १५ कोर्ट चालवित असल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन न्यायालयाच्या इमारतीमध्ये वकीलांसाठी असलेल्या लायब्ररी व कँटींगमध्ये सिव्हील प्रिझोनमध्ये कोर्ट बसविण्याची तात्पुरती व्यवस्था केली असून मंजूर न्यायाधीश, वकील व न्यायालयात येणारे पक्षकार यांच्या तुलनेत सध्याची इमारत अपुरी पडत असून सर्वांना अपु-या जागेमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल मध्ये नवीन कोर्ट इमारतीवर दोन मजले बांधणे व मोडकळीस आलेल्या जुन्या न्यायालयाच्या इमारतीच्या जागी नवीन कोर्ट इमारतीचे बांधकामसाठी तातडीने निधीची तरतूद करण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

पनवेल, जिल्हा रायगड-अलिबाग येथील नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये (तळमजला + १ मजला) दिवाणी न्यायधीश (क.स्त.) यांची ८ न्यायालये सुरु आहेत .

तसेच पनवेल येथे जुनी न्यायालयीन इमारत असून, त्यामध्ये देखील दिवाणी न्यायधीश (क.स्त.) यांची ८ न्यायालये सुरु होती. परंतु सन २०१९ मध्ये आलेल्या पुरामुळे सदर इमारत न्यायालये चालविण्यास अयोग्य बनली होती. त्यामुळे जुन्या इमारतीतील ८ न्यायालये नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आली. परंतु नवीन न्यायालयातील अपुऱ्या जागेमुळे सदर न्यायालये मेक-शिफ्ट स्तरावर चालविली जात आहेत. सबब, नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये १६ न्यायालये व कार्यालये चालविली जात आहेत. त्यामुळे सदर इमारत नागरीकांना, वकीलांना, न्यायालयीन कर्मचाऱ्यांना अपुरी पडत आहे.

(३) होय हे खरे आहे. नवीन इमारतीतील १६ कोर्ट चालविली जात आहेत. सबब, उपलब्ध जागेमध्ये आवश्यकतेप्रमाणे कोर्ट आणि त्यांचेसोबतची कार्यालये सर्वांच्या सोयीकरिता कार्यान्वित करण्यात आली आहेत.

(४) वर नमूद केलेल्या परिस्थितीमुळे नवीन न्यायालयीन इमारतीवर दुसरा व तिसरा मजला बांधण्याचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे. सदर मजल्यांवर १० नवीन कोर्ट हॉल बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर बांधकामाचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे विचाराधीन आहे. तसेच पनवेल येथील जुन्या इमारतीच्या जागी नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबतच्या प्रस्तावावर जिल्हा न्यायालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील दापोली, गुहागर संगमेश्वर, रत्नागिरी तालुक्यात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(२५) ७१८४९ (१४-०२-२०२४). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात दापोली, गुहागर तालुक्यात विविध ठिकाणी सुमारे १० कोटींहून अधिक किंमतीचा चरस या अंमली पदार्थाची पाकिटे माहे ऑगस्ट २०२३मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच संगमेश्वर, रत्नागिरी तालुक्यात लाखो रूपये किंमतीच्या अंमली पदार्थांच्या विक्रीची प्रकरणे माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चिपळूण येथे माहे मे, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान २ कोटी ८८ लाख रूपयांचे केटामाईन नामक अंमली पदार्थांची विक्री करताना ५ जणांना पोलिसांनी पकडले असून सदर अंमली पदार्थ लोटे (ता. खेड) औदयोगिक वसाहतीतील सुप्रिया लाईफसायन्स लि. या कंपनीमध्ये तयार करण्यात आल्याचे आणि पकडण्यात आलेल्यांपैकी काहीजण या कंपनीचे कर्मचारीच असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कारखान्यातून पुन्हा अंमली पदार्थांची निर्मिती केली जात आहे काय तसेच उपरोक्त गुन्हयांमध्ये सदर कारखान्याचा काही संबंध आहे काय याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हर्णै गाव समुद्रकिनारी तसेच गुहागर तालुक्यातील समुद्रकिनारी माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये एकुण रु ३,५१,९०,८००/- किंमतीची अंमली पदार्थाची पाकिटे सापडलेली आहेत. सदर बाबत दापोली पोलीस ठाणे येथे गु. र. नं १३१/२०२३ एनडीपीएस कायदा कलम ८(क),२०(ब)(२),२२(क) अन्वये दि.१५.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सन २०१४ साली चिपळूण पोलीस ठाणे यांनी ५ आरोपींना केटामाईन नामक अंमली पदार्थांची अनधिकृतपणे विक्री करणेच्या उद्देशाने जवळ बाळगले स्थितीत मिळून आल्याने अटक करण्यात आले होते. सदर गुन्ह्यात रू.२,७८,६०,०००/- किंमतीचा केटामाईन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील १ आरोपी हा सुप्रिया लाईफ सायन्स लिमीटेड कंपनी मध्ये हेल्पर म्हणुन कामाला असताना त्याने कंपनीत उत्पादित होणारी

केटामाईनची पावडर ही थोडी थोडी चोरुन कंपनीतून बाहेर आणुन ती दुस-या आरोपीकडे आणुन देत असे.

सदर कारखान्यामध्ये पुन्हा अंमली पदार्थांची निर्मिती केली जात नसून गुन्हे दाखल नाहीत. उपरोक्त गुन्हयांमध्ये सुप्रिया लाईफसायन्स लि. या कंपनीचा संबंध असल्याचा कोणताही पुरावा तपासामध्ये निष्पन्न झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव ( जि.नाशिक ) शहरात चो-यांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(२६) ७१९३६ (१४-०२-२०२४). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव ( जि.नाशिक) शहरात चो-यांचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगांव तालुक्यातील संगमेश्वर भागात एटीएम फोडण्याच्या, घरफोडयांचे सत्र सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यातील सावतानगर, नवनाथनगर, ज्योतीनगर, आदि नववसाहतीतील मोतीबाग नाका परिसरात वाढत्या चो-यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार या भागात पोलिस बंदोबस्त वाढून चोरटयांना अटक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२४) :** (१) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरात माहे ऑक्टोबर, २०२२ मधील चोरीच्या गुन्ह्यांच्या तुलनेत माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये चोरीचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून येत नाही.
(२) प्रश्नाधीन घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आलेले नाही.
(३) नाही.

तथापि, माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये मोतीबाग नाका, मोतीनगर येथे वाहन चोरीची एक घटना घडली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) मालेगाव शहरात गुन्ह्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस ठाणे हद्दीत नियमीत दिवसा व रात्रीच्या वेळी मोबाईल व बिट मार्शल पेट्रोलींग नेमण्यात येते. तसेच वेळोवेळी ऑलआउट नाकाबंदी व पेट्रोलींग नेमुण हद्दपार इसम व जेल रिलीज झालेल्या आरोपींवर लक्ष ठेवून संशयीत इसम व हिस्ट्रीशीटर चेक केले जातात.
(५) विलंब झालेला नाही.

---

## कारागृहातील रक्षकाची असेलेली रिक्त पदे भरण्याबाबत

**(२७) ७१९७९ (१४-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ६० कारागृहाची क्षमता २५ हजार ३९३ कैदी इतकी असून, प्रत्यक्षात तेथे ४१ हजार ५१४ कैद्यांना ठेवण्यात आले आहे,ही आकडेवारी पाहता, क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवण्यात आले असून ही आकडेवारी तब्बल १६३ टक्के असल्याचे गृह विभागाच्या आकडेवारीनुसार समोर आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय प्रमाणानुसार सहा कैद्यासाठी एक रक्षक असे प्रमाण असून सध्याच्या घडीला एका रक्षकाला दहापेक्षा अधिक कैद्यावर लक्ष ठेवण्याची वेळ आली असून राज्यातल्या साठ कारागृहांसाठी ५ हजार ६८ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत मात्र सद्या केवळ ४ हजार १९४ पदांना मंजूरी दिली आहे, त्यामुळे कैद्याच्या वाढत्या गर्दीमुळे कारागृहामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विधी महाविद्यालयातील रूची कक्कड यांनी मुंबईतील मध्यवर्ती कारागृहाला भेट देऊन कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी आढळून आल्यामुळे त्यांनी राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आयोगाने राज्य शासनाला कारागृहासाठी ६ हजार १३७ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षकांना दिला असून त्या विभागाने हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवला असून वित्त विभागाने कर्मचाऱ्याच्या संख्येवर कपात करण्यास सुचविल्यानंतर पोलीस महासंचालकांनी २ हजार २३८ पदांचा प्रस्ताव सादर केला होता त्यापैकी शासनाने २ हजार पदे निर्माण करण्यास मंजूरी दिली असून आजमितीस सदर पदे भरण्यात आलेली नाहीत, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंजूर करण्यात आलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०२४) :** (१) कारागृह विभागाची दि.३१.०१.२०२४ अखेर अधिकृत बंदीक्षमता २६,३७७ इतकी असून त्यामध्ये ४०,४८५ बंदी बंदीस्त आहेत.
(२) i) कारागृह विभागाचा ५०६८ पदांचा आकृतीबंध शा.नि.दि.१२.०८.२०२२ नुसार मंजूर झाला आहे.
ii) शा.नि. दि.६.१०.२०२३ नुसार २००० वाढीव पदांना मंजूरी देण्यात आली आहे.
iii) सद्यस्थितीत कारागृह विभागात वेगवेगळया संवर्गात ७०६८ इतकी पदे मंजूर असून कार्यरत पदांमधून कारागृह सुरक्षा चोख ठेवण्यात येत आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) i) कारागृह विभागासाठी शासन निर्णय दिनांक ०६.१०.२०२३ नुसार एकुण २००० वाढीव पदांना मंजूरी देण्यात आली आहे.
ii) त्यापैकी सरळसेवेची १६०१ पदे आहेत.
iii)कारागृह विभागाकरीता वैद्यकीय अधिका-यांची पदे भरणेबाबत वैद्यकीय विभागास अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांनी दि.०३.११.२०२३ अन्वये कळविले आहे.
iv) लिपिक व तांत्रिक संवर्गातील रिक्त पदे भरणेसंदर्भात दि.०१.०१.२०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर भरतीप्रक्रिया सुरु आहे.
v) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, पुणे यांनी कारागृह शिपाई संवर्गातील पद भरणेसंदर्भात अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि.२८.०२.२०२४ अन्वये केलेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने दि.०१.०३.२०२४ अन्वये जाहिरात प्रसिध्द केली आहे.
vi) विभागातील पदोन्नतीच्या ३९९ पदांपैकी ३४७ इतकी पदोन्नतीची पदे भरण्यात आली आहेत व उर्वरीत ५२ पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) मंजूर पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## मुंबई येथील म्हाडाच्या दुरुस्ती पुनर्विकासाच्या नवीन धोरणाअंतर्गत नोटीसा बजावल्याबाबत

**(२८) ७२०६४ (१३-०२-२०२४). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश**

**अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे म्हाडाच्या इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने पुनर्विकासाच्या नवीन धोरणाअंतर्गत ६७ प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून यापैकी १० प्रकल्प ताब्यात घेण्यासाठी तसेच जमीन संपादन करण्यासाठी दुरुस्ती मंडळाने शासनास प्रस्ताव सादर केल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हे प्रकल्प ताब्यात घेऊन ते पूर्ण करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाकडून मंजुरी देण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास त्यांची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०६-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

ज्या मालक/विकासकांनी उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत मंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर कोणतीच कारवाई केली नाही. तसेच महानगरपालिकेकडून आयओडी व नकाशे प्राप्त केल्यानंतर, इमारतीमधील भाडेकरु/ रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी भाडे देऊन, त्यांचे स्थलांतरण केले. पंरतू त्यांनतर नविन इमारतीचे काम सुरु करुन अर्धवट अवस्थेत सोडले, तसेच भाडेकरु/रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी भाडे सुध्दा देणे बंद केले, अशा एकूण ६१ प्रकरणांमध्ये मंडळाने सुधारित म्हाड अधिनियमातील कलम ९१ (अ) अंतर्गत नोटीस बजाविल्या आहेत.त्यापैकी एकूण ०६ अर्धवट अवस्थेत सोडलेल्या प्रकरणांमध्ये भुसंपादन प्रस्ताव गृहनिर्माण विभागास सादर केले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) म्हाडाने शासनास भूसंपादन मान्यतेकरीता सादर केलेले ०६ प्रस्ताव विचाराधिन आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील येरवडा कारागृहातील क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याबाबत

**(२९) ७२४८४ (१४-०२-२०२४). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा कारागृहात कैदयांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होऊन येरवडा कारागृहांची एकूण कैदयांची क्षमता २ हजार ७५२ इतकी असून सध्या ६ हजार ५२६ पुरुष व २३० स्त्रिया असून येरवडा करागृहातील क्षमतेपेक्षा २४६ टक्के अधिक कैदी असल्याची बाब माहे ऑगस्ट-२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येरवडा कारागृहात शिक्षा झालेल्या कैद्यांपेक्षा न्यायाधीन कैदयांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन क्षमतेपेक्षा वाढत्या कैदयांची समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२४) :** (१) येरवडा मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत बंदी क्षमता २,७५२ असून त्यापैकी पुरुष बंदी क्षमता २,५२६ व महिला बंदी क्षमता २२६ आहे. सद्य:स्थितीत एकूण ६,६६५ इतके बंदी दाखल असून त्यापैकी ६,३६४ पुरुष बंदी व ३०१ महिला बंदी आहेत. येरवडा मध्यवर्ती कारागृहात सद्य:स्थितीत क्षमतेपेक्षा २४२ टक्के अधिक बंदी दाखल आहेत.

(२) होय, खरे आहे.

सद्य:स्थितीत येरवडा मध्यवर्ती कारागृहात एकूण ५६१६ न्यायाधीन बंदी व १०४९ शिक्षाधीन बंदी दाखल आहेत.

(३) येरवडा मध्यवर्ती कारागृहात ०८ नवीन बॅरेक बांधकामापैकी ०७ बॅरेक बांधकाम पुर्ण करण्यात येवून सदरचे बॅरेकमध्ये बंदी ठेवण्यात आले आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्य योजने अंतर्गत ०८ नवीन बॅरेक (२०० बंदी क्षमतेचे) बांधकामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात आले आहे. कारागृहाच्या अस्तित्वातील जागेवर ३५०० बंदी क्षमतेचे नवीन येरवडा मध्यवर्ती कारागृह क्र.०२ बांधणे प्रस्तावित आहे. तसेच सामाजिकदृष्ट्या वंचित किंवा कमी शिक्षीत अथवा कमी उत्पन्न गटातील गरीब बंद्यांना जामिन मिळवून देणे या केंद्र शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनस्तरावर अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (अ. व सु.) यांच्या अध्यक्षतेखाली देखरेख समिती (Oversight Committee) व जिल्हा स्तरावर "अधिकारप्राप्त समिती ( Empowered Committee)" ची स्थापना अनुक्रमे गृह विभाग शासन निर्णय दि. १३ सप्टें २०२३ व दि.२७ डिसेंबर २०२३ अन्वये करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानवी निर्देशांकात मागे असलेल्या ९ जिल्ह्यांपैकी लातूर जिल्ह्याचा शेवटचा क्रमांक असल्याबाबत**

**(३०) ७२६४१ (०८-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२३ मध्ये निश्चित करण्यात आलेल्या मानवी निर्देशांक राज्यातील एकूण ९ जिल्ह्यांपैकी लातूर जिल्ह्याचा क्रमांक सर्वात शेवटचा आहे तसेच १ स्तरापेक्षाही कमी ०.६६ इतकाच निर्देशांक असून अद्याप निर्देशांक निश्चित करण्यात आलेला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानव निर्देशांकात कमी असलेल्या जिल्ह्यांमध्ये शासनाने कोणत्याही सुविधा अद्याप पुरविण्यात आलेल्या नसल्यामुळे या निर्देशांकात वाढ झालेली दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानव निर्देशांक कमी असलेल्या एकूण ९ जिल्ह्यांमधील निर्देशांकामध्ये सुधारणा होण्यासाठी मागील १२ वर्षात कोणते प्रयत्न करण्यात आले वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१२-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

मानव विकास निर्देशांक सन २०२३ मध्ये निश्चित करण्यात आलेला नाही. मानव विकास निर्देशांक सन २०११ नुसार लातुर जिल्हयाचा निर्देशांक ०.६६३ इतका आहे.

(२), (३) व (४) नियोजन विभाग, शासन निर्णय दि.१९.७.२०११ अन्वये राज्यातील २३ जिल्ह्यातील १२५ अतिमागास तालुक्यामध्ये "आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ" या ३ बाबींशी संबंधित "मानव विकास कार्यक्रम" राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

मानव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ पासून दरडोई उत्पन्न वाढविणे, आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण इत्यादी विषयीच्या नियमित योजना व जिल्हा तालुका स्पेसिफिक योजना या १२५ तालुक्यांत राबविण्यात येतात. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०२३ तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## नागपूर शहर आणि जिल्ह्याला सुरळीत विद्युत पुरवठा करण्यासाठी प्रलंबित असलेली कामे सुरु करण्याबाबत

**(३१) ७२७५४ (२०-०२-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर आणि जिल्ह्याला वीज पुरवठा करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजवणाऱ्या जात तरोडी उपकेंद्र वीज तारांचे जाळे अद्यापही तयार झाले नसल्याने सदरहू उपकेंद्र कार्यान्वित झाले नसल्याची बाब दि. १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात महापारेषणचे लेंडा पार्क व मिहान सबस्टेशनच्या प्रस्तावित कामाला मंजुरी मिळाली असतानाही अद्यापपर्यंत उपकेंद्र काम प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खापरी येथे प्रस्तावित पॉवर ट्रान्सफॉर्मर देखील अद्याप लावण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहर आणि जिल्ह्याला सुरळीत विदयुत पुरवठा सुरू राहण्यासाठी प्रलंबित असलेले उपकेंद्र, पॉवर ट्रान्सफॉर्मरची आणि वीज तारा जाळे तयार करण्याची कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत:

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महापारेषण कंपनीद्वारे जात तरोडी उपकेंद्र व भूमीगत केबलचे काम सुरु आहे.

(२) होय.

महापारेषण कंपनीद्वारे लेंड्रा पार्क व मिहान उपकेंद्र उभारण्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरु असून खापरी उपकेंद्रात अतिरिक्त रोहित्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) होय, हे खरे आहे.

महापारेषण कंपनीद्वारे १३२/३३ के.व्ही. खापरी उपकेंद्रात अतिरिक्त १३२/३३ के.व्ही., २५ एम.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र उभारण्यासाठीचा कार्यादेश देण्यात आला असून काम प्रगतीपथावर आहे. सदर काम मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्यास महापारेषण कंपनी प्रयत्नशील आहे.

(४) महापारेषण कंपनीद्वारे १३२/३३ के.व्ही. जात तरोडी Gas Insulated Substation (G.I.S.) उपकेंद्राचे अंदाजे ७५% काम पूर्ण झाले असून १३२ के.व्ही. जात तरोडी ते २२०/१३२ के.व्ही. नवीन पारडी उपकेंद्र अशी १३२ के.व्ही. भूमीगत द्विपथ केबल अंथरण्याचे काम दिनांक ०३.१०.२०२३ पासून सूरु झाले असून सुमारे ५ कि.मी. काम पूर्ण झाले आहे. वाहिनी व उपकेंद्राचे काम पूर्ण करुन १३२ के.व्ही. जात तरोडी उपकेंद्र जून २०२४ पर्यंत कार्यान्वित करण्यास महापारेषण कंपनी प्रयत्नशील आहे.

तसेच मंजूर असलेल्या १३२ के.व्ही. लेंड्रा पार्क व मिहान या G.I.S. उपकेंद्रांच्या उभारणीसाठीची निविदा प्रक्रिया सुरु असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन यशस्वी कंत्राटदारास कार्यादेश देऊन दोन्ही उपकेंद्राची कामे सुरु करण्यात येतील. यापैकी लेंड्रा पार्क उपकेंद्राची भूमीगत केबल अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे.

सद्यस्थितीत नागपूर जिल्ह्यात/ शहरात महापारेषण कंपनीकडून भार नियमन करण्यात येत नाही. परंतु भविष्यातील संभाव्य वीज मागणीचा पुरवठा करण्यासाठी व नागपूर शहर व जिल्ह्यातील अति उच्च दाब वीज प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी महापारेषण कंपनीद्वारे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) शहरी भागात विशेषत: महानगरात अति उच्च दाब केबल अंथरण्यासाठी महापारेषण कंपनीस विविध आव्हानांना तोंड द्यावे लागते. जात तरोडी उपकेंद्राच्याबाबतीत केबल अंथरण्यासाठी नागपूर महानगरपालिकेची परवानगी पाठपुराव्यानंतर व ठरावीक कालावधीसाठीच प्राप्त होते. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दाट लोकवस्तीतून उपक्रम चर (Utility Trench) खणून प्रथमतः Live (सेवा सुरु असलेल्या) केबल उदा. लघु दाब (LT), उच्च दाब (HT), दळणवळण व डेटा केबल, पाणी पुरवठ्याचे पाईप, सांडपाण्याचे पाईप, त्यांच्या संबंधित सेवेत खंड पडू न देता बाजुला

करुन नंतर अति उच्चदाब केबल अंथरण्यात येते व त्यावर वाळूचा थर टाकून मग पुन्हा त्यावर लघु दाब, उच्च दाब, दळणवळण व डेटा केबल व पाणी पुरवठ्याचे आणि सांडपाण्याचे पाईप अंथरण्यात येतात.

उपरोक्त नमुद तांत्रिक तरतुदींची पूर्तता करुन सुमारे १९ कि.मी लांबीची केबल अंथरण्याचे काम करण्यात येत असल्याने सदर कामास विलंब होत आहे.

---

**राज्याच्या गृह विभागाने पोलीस ठाण्याच्या निर्मितीसाठी नवी नियमावली तयार करण्याबाबत**

**(३२) ७२८६८ (१४-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या गृह विभागाने पोलीस ठाण्याच्या निर्मितीसाठी नवी नियमावली तयार केल्याचे माहे ऑगस्ट २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी भागात २ ते ४ की. मी. तर ग्रामीण भागात ४ ते ६ की .मी.च्या परिघात आता नवे पोलीस ठाणे असणार आहे, हे खरे आहे काय.

(३) असल्यास वरील नवीन नियमावली कधी लागू करण्यात येणार आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०२४) :** (१) होय,

राज्यात नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एपिओ-३६२२/प्र.क्र.१०४(१)/पोल-३, दि.२५.०८.२०२३ अन्वये नवीन पोलीस ठाणे निर्मितीसाठी मनुष्यबळाचे प्रमाणक/निकष नव्याने निश्चित केले आहेत. तसेच शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एपिओ-३६२२/प्र.क्र.१०४(२)/ पोल-३, दि.२५.०८.२०२३ अन्वये नवीन पोलीस ठाणे निर्मितीसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.

(२)

सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार नवीन पोलीस ठाणे निर्माण करताना ग्रामीण भागातील दोन पोलीस ठाण्यामधील अंतर सर्वसाधारणपणे १० कि. मी. पेक्षा जास्त नसावे व शहरी भागात ४ कि.मी. जास्त नसावे असे नमूद करण्यात आले आहे.

(३) उक्त शासन निर्णय हे दि.२५.०८.२०२३ पासून लागू झाले आहेत.

---

**राज्यात विविध विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३३) ७२८८३ (०८-०२-२०२४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : तारांकित प्रश्न क्रमांक ४७२५८ ला दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विभागातील व संवर्गातील तब्बल ३० टक्के पदे सद्य:स्थितीत रिक्त असल्याची अधिकृत माहिती माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शासनाच्या ३२ विभागांत ७ लाख २४ हजार ८०८ अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून त्यातील ४ लाख ८३ हजार ८९५ पदे भरलेली आहेत तर २ लाख ३९ हजार ९०३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदांपैकी आरक्षित प्रवर्गांपैकी इतर मागास प्रवर्गाची (ओबीसी) १६ टक्के पदे रिक्त असल्याची माहिती वित्त विभागाने जाहीर केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या आकडेवारीतून समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त रिक्त पदांपैकी नाशिक विभागातील ३२,६७१, नागपूर विभागातील ३६,४१२, संभाजीनगर विभागातील ३३,७४२, अमरावती विभागातील २१,४१४, पुणे विभागातील ४३,४४४, कोकण विभागातील ३०,२३० आणि मुंबई विभागातील ४१,९९० इतक्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने त्याचा ताण इतर कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यात विविध विभागातील व संवर्गातील ३० टक्के रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०८-०४-२०२४) :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) असे निदर्शनास आले नाही.
(४) असे निदर्शनास आले नाही.
(५) देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्ताने मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना शासन निर्णय दि.३१.१०.२०२२ अन्वये १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी संबंधीत ८० टक्के रिक्त पदे भरण्यास आणि लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली होती. सदर कालावधी आता संपुष्टात आला असल्याने शासन निर्णय दि.३०.९.२२ मधील तरतूदी लागू झाल्या आहेत. त्यानुसार ज्या विभाग व कार्यालये यांनी सुधारित आकृतीबंध उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने अंतिम केला आहे त्या विभागांना लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळसेवेची १०० टक्के पदे भरण्याची अनुमती देण्यात आली आहे आणि लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. सर्व प्रशासकीय विभागांनी त्याप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) येथे नवीन राज्य उत्पादन शुल्क कार्यालये बांधण्याबाबत

**(३४) ७३१७९ (२०-०२-२०२४). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १८२ मधील प्रश्न क्रमांक ५७१९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव येथील निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगांव, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगांव व दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शेगांव हे तिन्ही कार्यालये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत एकाच इमारतीत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा यांनी सदर इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्याबाबत दि.१०.०५.२०२३ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, खामगांव यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागाची जागा पोलीस विभागाच्या ताब्यात असल्याने ती राज्य उत्पादन शुल्क विभागास उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेस्तरावरून अर्धशासकीय पत्र दि.३१.१२.२०२१ व स्मरणपत्र दि.१५.०३.२०२२ अन्वये जिल्हा पो. अधीक्षक, बुलढाणा यांना विनंती केली आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक,बुलढाणा यांनी त्यांचे अर्धशासकीय पत्र दि.२३.०३.२०२२ नुसार त्यांचे मालकीच्या जागेवरील बांधकामाचा प्रस्तावास मान्यता मिळालेली असून बांधकाम पूर्ण होताच सदरची जागा परत करण्याची तजवीज केल्याबाबत अवगत

केले आहे. हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरची जागा पोलीस विभागाकडून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०७-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदरच्या जागेत अप्पर पोलीस अधीक्षक, खामगांव यांचे कार्यालय आहे. सदरची जागा रिकामी करुन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ताब्यात मिळावी म्हणून अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा कार्यालयाने वेळोवेळी पोलीस अधीक्षक, बुलडाणा कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे. पोलीस अधीक्षक, बुलढाणा कार्यालयाने त्यांच्या नवीन कार्यालयाचे बांधकाम पूर्ण होताच सदरची जागा राउशु विभागास दिली जाईल, असे कळविले आहे.
(५) प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

## सांगली जिल्हयातील कृष्णा व भीमा खो-यासाठी जलसंपदा विभागाकडून उभारण्यात आलेली पूरमापक यंत्रणा अपयशी ठरत असल्याबाबत..

**(३५) ७३२२५ (१३-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील कृष्णा व भीमा खो-यासाठी जलसंपदा विभागाकडून उभारण्यात आलेली पूरमापक यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूरमापक यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीअभावी सदरील यंत्रणा बंद असल्याने पारंपारिक पध्दतीने पूरमापक मोजमाप होत आहे, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी करुन आढावा घेऊन सांगली जिल्हयातील पूरमापक यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
सांगली जिल्ह्यातील कृष्णा व भीमा खोऱ्यासाठी जलसंपदा विभागाकडून उभारण्यात आलेली पूरमापक यंत्रणा माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सुस्थितीत होती व पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होती व आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील धारावी पुनर्वसन प्रकल्पासंदर्भात म्हाडाच्या कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत

**(३६) ७३३६७ (१३-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.कुणाल**

**पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास अदाणी रिअल्टीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या अटीनुसार अदानी समुहाला लवकरात लवकर कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिले असतानाही आराखडा तयार करण्यात आला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिला आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, धारावी पुनर्वसन क्षेत्रात रिहॅब इमारती, शाळा, उद्याने व रुग्णालये त्याच बरोबर एक बिझनेस सेंटर लघुउद्योग बाहेर जाण्याची भिती तेथील सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. तसेच सदर प्रकल्प आराखड्याबाबत स्पष्टता नसल्याचा धारावीकरांचा आक्षेप असून धारावीचा पुनर्विकास प्रकल्प होत असतांना त्याचा सुरुवातीला विकास आराखडा जाहीर करण्यात यावा अशी धारावीकरांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुनर्वसन प्रकल्पासंदर्भात धारावीकरांची फसवणूक होत असल्याने विविध राजकिय पक्षांनी व संघटनानी दिनांक १२ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास म्हाडा कार्यालय, बांद्रा येथे मोर्चा काढला होता हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मागण्यांबाबत आढावा घेऊन धारवी झोपडट्टीचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. अतुल सावे (०४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) धारावी अधिसूचीत क्षेत्रांतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १३.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मे. अदानी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड यांची मुख्य भागीदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. निविदेतील अटी/शर्तींप्रमाणे त्यांनी धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेड ही विशेष हेतु कंपनी स्थापन केली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प, विशेष हेतु कंपनीमार्फत दिनांक ०५.११.२०१८ व २८.०९.२०२२ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणार आहे. निविदेत नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक १५ डिसेंबर २०२३ रोजी, विशेष हेतु कंपनीने बृहत आराखडा संबंधित कागदपत्रे सादर केली आहेत, जी विशेष हेतु कंपनीमार्फत अद्ययावत आणि सुधारित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) धारावी अधिसुचित क्षेत्राअंतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्पाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३३ (९)(अ) व ३३ (१०)(अ) मधील व प्रकल्पाच्या निविदेतील तरतूदी तसेच मानक प्रमाणपध्दती (Standard Norms) नुसार पुनर्वसन / नागरीनुतनीकरण इमारती, शाळा, उद्याने, खेळाचे मैदाने, रूग्णालये, बिझनेस सेंटर तसेच पायाभूत सोई सुविधा यांचा नियोजनात्मक समावेश असलेला प्रारूप बृहत आराखडा तयार करून धारावीकरांच्या माहितीकरिता जाहिर करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रदूषण न करणाऱ्या उद्योगांसह पात्र निवासी व अनिवासी झोपडीधारक तसेच चाळी व इमारतींमधील पात्र रहिवाश्यांचे पुनर्वसन धारावीमध्ये करण्यात येणार आहे.

(४) व (५) धारावी पुनर्विकास समिती अंतर्गत सर्व पक्षीय व सर्व जनसंघटनांचे धारावी बचाव आंदोलन या समितीचे दिनांक १२.१०.२०२३ रोजीचे निवेदन या विभागास प्राप्त झाले असून, सदर निवेदनात नमूद केलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने बैठक घेण्याची विनंती केली आहे. त्यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांची बैठकीसाठी वेळ मिळण्याकरिता नस्ती सादर करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) येथे ऑनलाईन फसवणूक होत असल्याबाबत

**(३७) ७३३८० (१४-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील एका व्यावसायिकांची दि. २५ व २६ ऑगस्ट, २०२३ रोजी ऑनलाईन ३ लाख ३१ हजार ९९९ रुपयांची आर्थिक फसवणूक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन गुन्हयाचा तपास करण्यासह येथील नागरिकांची ऑनलाईन फसवणूक होवू नये यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर बाबत जत पोलीस ठाणे येथे दि.११.१०.२०२३ रोजी गु.र.नं. ६१५/२०२३ भादंवि कलम ४२०, आय.टी. ॲक्ट ६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

नागरिकांची ऑनलाईन फसवणुक होवू नये याकरीता वर्तमानपत्रे तसेच ऑनलाईन फसवणुक संदर्भातील चलचित्र फिती तयार करुन सोशल मिडीया मध्ये प्रसारीत करुन जनजागृती करण्यात आलेल्या आहेत. तसेच स्थानिक बँका, पतसंस्था, यांचे मार्फतीने फसवणुकी संदर्भात जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील तलावांच्या विविध कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत

**(३८) ७३४८७ (११-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलाव व अशोक चौक येथील मार्कंडेय जलतरण तलाव असे दोन तलाव असल्याने या तलावांच्या विविध कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत रुपये १६२.०० लाख (जीएसटीसह) देण्याची मागणी सोलापूर मनपाने केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) "स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलाव व मार्कंडेय जलतरण तलाव येथे स्प्रिंगबोर्ड व ड्रायव्हिंग पिट बसविणे' या कामासाठी रु. १६२.०० लक्ष निधी मागणीबाबत सोलापूर महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या दिनांक १४.०२.२०२४ च्या आदेशान्वये रु. १६१.९९७३१ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाच्या अनुषंगाने रु. १४०.०० लक्ष इतक्या रकमेचे वितरण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे कायमस्वरूपी फायर फायटिंग सेवकांचे निवासस्थान बांधण्याबाबत

**(३९) ७३४९० (१४-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे कायमस्वरूपी फायर फायटिंग सेवकांचे निवासस्थान बांधण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने ठराव केल्याप्रमाणे माहे जुलै २०२३ मध्ये एमआयडीसीच्या झालेल्या बैठकीत भूखंड समितीत फायर स्टेशन साठी जागा मंजूर केली असून या ठिकाणी फायर फायटिंग सेवकांचे निवासस्थान बांधण्यासाठी रुपये १२५.०० लाखाचा निधी जिल्हा नियोजन समितीकडे मागितला आहे, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१२-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

महाराष्ट्र अग्निशमन अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अग्निशमन सेवेचे बळकटीकरण या योजनेखाली, सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे कायमस्वरूपी फायर फायटिंग सेवकांचे निवासस्थान बांधण्यासाठीच्या प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीची दिनांक २०.१०.२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन दिनांक २४.१२.२०२३ व दिनांक १३.०२.२०२४ च्या आदेशान्वये रु.१३१.५८ लक्ष निधी वितरण संबंधित यंत्रणेस करण्यात आले

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे सावळेश्वर (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील जुना सोलापूर रस्त्यावर दोन बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबाबत

**(४०) ७३५०१ (१९-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावळेश्वर (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील जुना सोलापूर रस्त्यावर दोन बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक ग्रामपंचायत व लोकप्रतिनिधी यांनी करुनही अद्यापपर्यंत दुरुस्ती केली नसल्याने येथील नागरिकांची व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंधारा दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (१३-०३-२०२४) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) सदर योजनेच्या ठिकाणी CD Work बांधण्यासाठीचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समितीकडे दिनांक २३/०६/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आलेले आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त होताच योजनेचे काम सुरु करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातून वाहणारा उजनी डावा कालवा फुटल्याने शेतकर्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(४१) ७३५०३ (१३-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील भीमा उजनी प्रकल्पाच्या डावा कालवा कि.मी ११३ मध्ये फुटल्यामुळे मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विहिरी व शेततळयामध्ये माती जाऊन मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालवा फुटल्यामुळे कि.मी ११३ च्या पुढील मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर या गावातील शेतकऱ्यांना कालवा दुरुस्त होईपर्यंत अनेक दिवस पाणी न मिळाल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई तातडीने देयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंधारण मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२३ मध्ये निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

उजनी डावा कालवा दि.२९/०१/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजता फुटला होता. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विहिरी व शेततळयामध्ये माती जाऊन काही प्रमाणात नुकसान झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

दि. २९/०१/२०२३ रोजी सकाळी कालवा फुटल्यानंतर विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडील मशिनरीद्वारे कालवा दुरुस्तीचे काम तात्काळ सुरु करुन दि.२२/०२/२०२३ रोजी काम पूर्ण करण्यात आले. सदर काम तातडीने पूर्ण करुन आवर्तन सुरु करण्यात आल्यामुळे उजनी डावा कालवा किमी ११३ च्या खालील भागातील कोणत्याही पिकाचे नुकसान झाले नाही, अथवा तशी मागणी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.०१/०३/२०२३ रोजी उपमुख्यमंत्री महोदयांना दिलेले निवेदन प्राप्त आहे.

या निवेदनामध्ये कालवा फुटून ज्या शेतकऱ्यांचे शेताचे/पिकांचे नुकसान झालेले आहे. त्याच्या नुकसान भरपाईची मागणी आहे.

कालवा फुटल्यामुळे मोहोळ तालुक्यातील मौजे पाटकूल तसेच पंढरपूर तालुक्यातील मौजे विटे व फुलचिंचोली येथील नुकसान झालेल्या पिकांचे विहिरीचे इत्यादींचे पंचनामे पूर्ण केलेले आहेत. त्यानुसार नुकसान भरपाईचा मुल्यांकन अहवाल तयार करण्यात आलेला असून सदर प्रस्ताव महामंडळास सादर करण्यात आला आहे. त्यावर महामंडळाच्या दि.२०.०२.२०२४ रोजीच्या निर्देशानुसार सदर प्रस्ताव मान्यतेसाठी महामंडळाच्या नियामक मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील बंधा-यांची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत.**

**(४२) ७३५५८ (१७-०२-२०२४). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :**

सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातीन ३५२ पैकी बहूतांश बंधा-यांना तातडीच्या दुरुस्तीची गरज निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे प्रशासनाने सुमारे २५ ते ३० बंधा-यांची दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे ५ कोटी रुपयांचा निधी मिळावा यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सर्व बंधा-यांची पहाणी करुन सदर बंधा-याच्या दुरुस्ती प्रस्तावाला मान्यता देऊन तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-०३-२०२४) :**
(१) व (२) हे खरे नाही.
या विभागाकडे एकूण ६६ बंधारे असून सदर बंधाऱ्यांना तातडीची दुरुस्ती आवश्यक नाही. त्यामुळे दुरुस्तीसाठी निधी मिळणेबाबतचा कोणताही प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मालाड (पश्चिम),येथे गांजा व अमली पदार्थ जप्त केल्याबाबत

**(४३) ७३६६८ (१७-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड (पश्चिम),येथील आंबोजवाडी नाका, कच्चा पट्टा, मालवणी बस आगारामागे, प्लॉट नं.२६, प्लॉट नं.३२, प्लॉट नं.३८, प्लॉट नं.६८, पतंगवाला ग्राऊंड, आर.एस.सी-१० च्या मैदानासमोर ८१ किलो ७१२ ग्रॅम एम.डी. ड्रग्ज, हेरॉईन, चरस, गांजा व अमली पदार्थ मालवणी पोलिसांनी जप्त केल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात मालवणी पोलिसांनी कांही जणांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली तसेच अशा घटनाना वारंवार घडू नये यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

### मुंबई शहरातील पीटीसी प्रकल्पग्रस्त सदनिकांमध्ये परिवर्तनाकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत

**(४४) ७३८३९ (१३-०२-२०२४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये ३३-११ या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर पीटीसीची निर्मिती होत असून विद्यमान धोरणानुसार फक्त भाडेतत्त्वावर देण्याची योजना असल्यामुळे या सदनिका प्रकल्पग्रस्तांना देता येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत प्रकल्प बाधित लोकांची संख्या एक लाखापेक्षा जास्त असून तयार पीटीसी या भाडेतत्त्वावर मिळत असल्यामुळे प्रकल्पग्रस्त त्या ठिकाणी जाण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना प्रकल्पग्रस्त सदनिकांमध्ये परावर्तित केल्यास प्रकल्पग्रस्तांना घर मिळून मुंबई शहरामधील अनेक स्थगित प्रकल्प मार्गी लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनान चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने करुन पीटीसीचे प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या मध्ये परिवर्तन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) कायमस्वरुपी संक्रमण सदनिका पीएपी सदनिकात परिवर्तित केल्यास संक्रमण सदनिकांची उपलब्धता कमी होईल. विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार पीटीसी सदनिकांचा वापर मंजूर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना तात्पुरती पर्यायी निवास व्यवस्था करण्यासाठी आहे. त्यामुळे पीटीसी सदनिका पीएपी सदनिकांत परावर्तित केल्यास, त्याचा मूळ हेतू साध्य होणार नाही. पर्यायाने खाजगी विकासकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी संक्रमण सदनिका उपलब्ध होणार नाहीत. परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजना जलदगतीने पूर्ण करण्यात अडथळा निर्माण होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरखेड (जि.यवतमाळ) येथे महावितरणाचे विभागीय कार्यालय मंजूर करण्याबाबत

**(४५) ७४००९ (१७-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे महावितरणाचे विभागीय कार्यालय मंजूर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश विशेष कार्य अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग , महाराष्ट्र शासन , मंत्रालय यांनी दि. २८.८.२०२३ रोजीच्या सुमारास अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी मर्या. प्रकाशगड, वांद्रे, मुंबई याना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार या प्रकरणी कोणती कार्यवाही तसेच त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीच्या दि. ०४.११.२०१० च्या आदेशानुसार विभागीय कार्यालय विभाजनाकरिता २,४०,००० इतकी ग्राहक मानंक संख्या असणे आवश्यक आहे. पुसद विभागीय कार्यालय तसेच उमरखेड मतदारसंघ अंतर्गत असलेल्या वीज ग्राहकांची संख्या १,६८,२२२ इतकी असून,ग्राहक मानंकानुसार पुसद विभाग सद्य:स्थितीत विभाजनक्षम नाही. भविष्यात सदर निकष पूर्ण झाल्यास कंपनीची ग्राहक मानके व आर्थिक दायित्वाचा विचार करुन योग्य कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील ढाणकी शहरामध्ये पोलिस ठाणे निर्माण करण्याबाबत

**(४६) ७४०११ (१४-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील ढाणकी शहरामध्ये पोलिस ठाणे निर्माण करण्याबाबत पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.२८.७.२०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय यांना पोमसं/२६-अ/ढाणकी पो.ठा/यवतमाळ/२१/२०२३ अन्वये बिटरगांव ऐवजी ढाणकी शहरामध्ये पोलिस स्टेशन स्थलांतरीत करण्याकरिता कोणतीही हरकत नसल्याचा अभिप्राय दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव पोलिस महासंचालक, मुंबई यांच्याकडून दि.२८.७.२०२३ रोजी शासनास प्राप्त झाला असून अद्याप पर्यत शासनाचे या प्रकरणात कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने ढाणकी शहरामध्ये पोलिस स्टेशन स्थलांतरीत करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०२४) :** (१) होय,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दि.२८.०७.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्रस्तावित ढाणकी पोलीस ठाणे बिटरगांव येथून ढाणकी येथे स्थलांतरित करण्यास मान्यता देण्याची विनंती शासनास केली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

पोलीस महासंचालक कार्यालयाने उक्त दि.२८.०७.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेल्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने, त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास शासनाच्या दि.१२.१०.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

सुधारित प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सवना ( ता.महागाव, जि.यवतमाळ ) येथील शेतकऱ्यांचा शेतातील ऊस वीज मंडळाच्या हलगर्जीपणामुळे जळाला असल्याबाबत

**(४७) ७४०२४ (१४-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सवना ( ता.महागाव, जि.यवतमाळ ) येथील शेतकरी गोविंदराव देशमुख यांच्या शेतातील उभा ऊस वीज मंडळाच्या हलगर्जीपणामुळे जळून गेल्याचे दिनांक १८ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याकरिता शेतकरी वारंवार वीज मंडळाकडे मागणी करुनही अद्याप मदत न मिळाल्याने दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ रोजी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्याअनुषगांने शेतकऱ्यांला आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.गोविंदराव देशमुख यांच्या मौजे सवना येथील शेतातील ऊसाला दि. १८.०३.२०२२ रोजी आग लागली होती.

(२) होय, हे खरे आहे.

श्री.गोविंदराव देशमुख यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना नुकसानभरपाई न मिळाल्याने दि.१५.०८.२०२३ रोजी आत्मदहन करीत असल्याबाबत निवेदन दिले.

(३) सदर घटनेची विद्युत निरीक्षक, यवतमाळ यांनी चौकशी करुन,अपघातग्रस्त शेतमालकास नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी महावितरणची असल्याचे अभिप्राय दिले. प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी पीक नुकसानभरपाई रु.१,२५,३४६/-दि. ०७.०९.२०२३ रोजी मंजूर केले. सदर रक्कमेतून श्री.गोविंदराव देशमुख यांच्या घरगुती ग्राहक थकबाकी रु.४७५०/- व कृषीपंपाची थकबाकी रु.४०४४०/- असे एकूण रु.४५१९०/-कपात करुन एकूण रक्कम रु.८०,१५६/-दि.३१.१०.२०२३ रोजी त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महागांव तालुक्यातील ( जि.यवतमाळ ) घोणसरा, बंगेवाडी येथे शेतक-यांच्या शेतात धाडी टाकल्याबाबत**

**(४८) ७४०३४ (२०-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोणसरा, बंगेवाडी (ता.महागांव,जि.यवतमाळ) येथे स्थानिक गुन्हे शाखेकडून गांजाप्रकरणी कारवाई करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी किती शेतक-यांच्या शेतावर धाडी टाकण्यात आल्या आहेत,

(३)असल्यास, या शेतक-यांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) असल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) दि.०४.१०.२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस ठाणे पुसद ग्रामीण, जि.यवतमाळ हद्दीतील ग्राम घोन्सरा व काळी दौलत (ता.महागांव) शेत शिवारात काही शेतक-यांच्या शेतात विक्री करण्याच्या उद्देशाने अवैधरित्या गांजा या अंमली पदार्थाचे झाडाची मोठ्या प्रमाणात लागवड केली असल्याच्या प्राप्त गोपनीय माहितीवरुन ५ शेतक-यांच्या शेतात छापा टाकून पोलीस ठाणे पुसद ग्रामीण येथे गु.र.नं. ७८४/२३ एन.डि.पी.एस.कायदा कलम २०,२० (ब) (i),२० (ब) (ii), २०(क),२९,४६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकुण ५ आरोपींपैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली असुन १ आरोपी फरार आहे व गुन्ह्याबाबत दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर केले असुन सदर प्रकरण सध्या मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

---

**धाराशिव जिल्हयातील अवैध धंदयाना आळा घालण्याबाबत**

**(४९) ७४०६४ (१७-०२-२०२४). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गावरील उमरगा ते जकेकूर चौरस्त्यालगत रिलायन्स पेट्रोल पंपाच्या पाठीमागे अवैधरित्या बनावट गुटखा तयार करणा-या कारखान्यावर उमरगा पोलिसांनी माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकून ४८ लाख ४५ हजार ५०० रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशी शहरासह (जि.धाराशिव ) तालुक्याच्या ग्रामीण भागात अवैध दारु विकी,मटका,जुगार यासारखे अवैध धंदे मोठया प्रमाणात सुरु असून गुटखा विक्री देखील खुलेआम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली तसेच अवैध धंदयाना आळा बसण्याच्या दृष्टीनेकोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरु आहे हे खरे नाही. वाशी शहरात माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये अवैध दारु विक्री करणारे २ इसमांविरुध्द २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वाशी ग्रामीण भागात ५ इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध मटका खेळणारे व खेळवणारे ४ इसमांविरुध्द व अवैध जुगाराविरुध्द १० व्यक्ती विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध गुटखा विक्री निदर्शनास आलेले नाही. सदर प्रकरणी आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

### दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात अंमली पदार्थांची होत असलेली विक्री

**(५०) ७४१४९ (१७-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोवा-कर्नाटक सीमेवर असलेल्या दोडामार्ग तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) येथे दिवसेंदिवस अंमलीपदार्थांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोडामार्ग तालुक्यातील तरुणांना ड्रग्ज, गांजा पुरविणा-या टोळीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांनी अपर पोलीस अधिक्षक यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन अंमलपदार्थाची विक्री करणा-या टोळीवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी कोणत्या सक्षम उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) दोडामार्ग तालुक्यातील तरुणांना ड्रग्ज, गांजा पुरविणा-या टोळीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांनी दि.०४.०९.२०२३ रोजी अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडे केलेली होती.
(३) अंमली पदार्थांची विक्री तसेच वाहतूक होऊ नये या करीता गोवा तसेच कर्नाटक राज्याच्या सीमेलगत असलेल्या पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांना त्याबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हयाच्या सिमेलगतचे भागात बांदा, सावंतवाडी, वेंगुर्ला व दोडामार्ग हद्दीतून जाणारे बॉर्डरवर बांदा, सातार्डा, आरोंदा, रेडी, बिजघर एकूण ५ चेक पोस्ट उभारण्यात आलेले असून त्या ठिकाणी २४ तास अधिकारी व अंमलदार हे अंमली पदार्थाची अवैध वाहतुक होऊ नये याकरीता ये जा करणारे वाहनांची तसेच पर्यटकांची तपासणी करीत असतात.
जिल्हयामध्ये अंमली पदार्थाची तस्करीचे सबंधाने चेक पोस्ट फिरते पथक तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये १ स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी, २ महिला पोलीस अंमलदार, नायब तहसिलदार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, कर्मचारी आहेत. तसेच जिल्हा स्तरावर अँटी नार्कोटीस सेल निर्माण करण्यात आलेला असून त्यामध्ये २ अधिकारी व ५ अंमलदार कार्यरत आहेत.घटकामध्ये जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती व नार्को को. ऑर्डीनेशन बैठक दर महिन्यात आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये अंमली पदार्थाचा वापर रोखण्यासाठी सर्व विभागामध्ये समन्वय ठेऊन व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री. जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.